# नवजात बालकांसाठी महापालिका रुग्णालयात अतिदक्षता विभाग सुरू

पुणे, दि. ६ (प्रतिनिधी) – सर्वसामान्य लोक पैसे नसल्यामुळे दवाखान्यात येण्यास घाबरतात. परिणामी गर्भवती स्त्री किंवा नवजात अर्भकाला उपचाराअभावी मृत्यूला सामोरे जावे लागते. हे टाळण्यासाठी धनिकांनी समाजहिताच्या कामासाठी पैसे खर्च करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री गिरीश बापट यांनी केले.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशन यांच्या पुढाकाराने येरवडा येथील भारतरत्न राजीव गांधी रुग्णालय आणि भवानी पेठेतील चंदुमामा सोनावणे प्रसुतिगृह येथे नवजात अर्भकांसाठी दोन अतिदक्षता विभाग उभारण्यात आले आहेत. या विभागाचे उद्‌घाटन पालकमंत्री गिरीश बापट यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महापौर मुक्ता टिळक, उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, आमदार जगदीश मुळीक, पालिका आयुक्त सौरभ राव, माजी आयुक्त कुणाल कुमार, सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, स्थायी समितीचे अध्यक्ष योगेश मुळीक, शिवसेनेचे गटनेते संजय भोसले, मुकुल माधव फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया, डॉ. अंजली साबणे, नगरसेविका अर्चना पाटील, नगरसेवक अविनाश बागवे आदी उपस्थित होते.



▪ यूपीएससी परीक्षेत अंध असूनही यश मिळविणाऱ्या सिंहगड रोड परिसरात राहणाऱ्या जयंत किशोर मंकले यांचा शिवसेना खडकवासला मतदारसंघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. खडकवासलाचे संपर्कप्रमुख प्रीतम उपलप, शहर उपप्रमुख जयसिंग दांगट-पाटील, शहर समन्वयक संतोष गोपाळ, महिला संघटिका पल्लवी पासलकर, विधानसभा क्षेत्रप्रमुख नितीन वाघ, विभागप्रमुख नीलेश गिरमे, विभाग उपप्रमुख नानासाहेब मरगळे, शाखाप्रमुख सतीश पंधेरे आणि शिवसैनिक उपस्थित होते.